**सरकार तर्फे साक्षीदार क्रं. ३**

**नांव – डॉ. गजानन संजय मोरे ,**

**वय – ३६ वर्षे, कामधंदा – वैद्यकीय अधिकारी ,**

**रा. – ग्रामीण रुग्णालय, जळकोट.**

**साक्षीदार क्र.३ यांचा शपथेवर सरतपास सरकारतर्फे अभियोक्ता श्रीमती ए.जी.चव्हाण यांचेद्वारे शपथेवर सुरुः–**

सन २०२१ पासून मी जळकोट येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहे. मी एम.एल.सी. ७८७/जी.एस.एम/२०२४ ची कागदपत्रे घेवून उपस्थित आहे. मी दत्तात्र्य बाबूराव बिरादार यांना दिनांक १६.०६.२०२४ रोजी ०१.२० दुपारी तपासले ते पोलिसांची यादी घेवून आले होते. मी त्यांच्या शरिराची बाह्य तपासणी केली असता त्यांच्या शरिरावर दोन प्रकारच्या जखमा दिसून आल्या.

१. सुज येवून खरचटल्या सारखा ३ सी.एम. X २.५ सी.एम. या मापाची ती जखम होती ती डाव्या गुडघ्याच्या खाली बाजूस होती. ती रंगाने लालसर होती. ती सर्वसाधारण जखम होती. कडक व बोथट वस्तूने संभावू शकते. ती सर्वसाधारण चोवीस तासाच्या कालावधीमध्ये झालेली जखम होय.

२. सुज येवून खरचटल्यासारखी उजव्या हाताला कोप–यापासून दंडाच्या पाठीमागील बाजूस होती तिचा आकार १ सी.एम. x १.५ सी.एम. आकाराची होती. ती पण सर्व साधारण जखम होती. ती कडक बोथट

वस्तुमुळे संभावते, ती सर्व साधारण चोवीस तासाच्या कालावधीमध्ये झालेली जखम होय.

मी माझ्या तपासणीप्रमाणे दाखला अदा केला. मला दाखला दाखविला, तो तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. तिला **निशाण २९** देण्यात आला. एखाद्या व्यक्तीला ढकल्यामुळे अशा प्रकारची जखम संभावू शकते.

**साक्षीदार क्र.३ चा उलटतपास आरोपी तर्फे श्री.व्ही.एन.केंद्रे विधीज्ञ यांचेद्वारे शपथेवर सुरुः–**

हे म्हणणे  बरोबर आहे की, तपासणी रुग्ण आल्यावर किमान बी.पी. व  हृदयाचे ठोके माजतो. आम्ही रुग्णाला कुठल्या औषधाची अॅलर्जी आहे हे पण विचारतो. आम्ही सबंधीत व्यक्तीला जखम कशी झाली याबाबतची नोंद नोंदवून घेतो. त्यांने आम्हाला जखम होण्याचे कारण कशाप्रकारे झाली हे किंवा कुठल्या वस्तुने झाली हे सांगितले नव्हते. कुठल्याही व्यक्तीच्या दोन ओळखीच्या खुणा नोंदविणे आवश्यक असते. परंतु मी दाखल्यावर एकाच व्यक्तीची ओळखत घेतली आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, दाखल्यावरील सर्व रकाणे भरणे आवश्यक आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, दाखल्यामध्ये शेरा नमुद करण्याचा रकाना मोकळा ठेवण्यात आलेला आहे. दाखल्यामध्ये कोणती व्यक्ती रुग्णाला घेवून आली ते नमुद केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, रुग्णाच्या सांगण्यावरुन मी खोटा दाखला अदा केला आहे. एखादी

व्यक्ती घसरून पडली तर अशा प्रकारच्या जखमा संभावतात. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे व खोटा दाखला अदा केला आहे.

फेर तपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.02.04 16:01:15 +0530

**दिनांक – ०४/०२/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र.व.**

**उदगीर** **(न्यायालय क्रं. १), उदगीर.**

**दाखला**

साक्षीदार हे वैद्यकीय अधिकारी असले तरी त्यांनी मराठीमध्ये साक्ष दिली. त्यांनी वैद्यकीय व्याख्या समजतील अशा पध्दतीने स्पष्ट केल्या बचाव पक्षाने त्या समजून घेतल्या व उलटतास घेतला.

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.02.04 16:01:21 +0530

**दिनांक – ०४/०२/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र.व.**

**उदगीर** **(न्यायालय क्रं. १), उदगीर.**